# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२३

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यातील संगणक परिचालकांचा (डाटा ऑपरेटर) ग्रामपंचायत कर्मचारी आकृतीबंधामध्ये समावेश करण्याबाबत

**(१) १२०७२ (३०-०३-२०२२) श्री.विलास पोतनीस : तारांकित प्रश्न क्रमांक १०४१९ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावलकर समितीच्या शिफारसीनुसार राज्यातील संगणक परिचालक पदनिर्मिती करण्यात येणार असून त्यानुसार संगणक परिचालकांचा (डाटा ऑपरेटर) ग्रामपंचायत कर्मचारी आकृतीबंधामध्ये समावेश करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप आणि सद्य:स्थिती काय आहे तसेच, सदरहू प्रस्तावास शासनाने मान्यता दिली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२६-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) संगणक परिचालकांचा (डाटा ऑपरेटर) ग्रामपंचायत कर्मचारी आकृतीबंधामध्ये समावेश करण्यासंदर्भात यावलकर समितीने शासनाकडे शिफारस सादर केली आहे.त्यानुषंगाने,राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतिबंध निर्माण करण्याकरीता सर्व जिल्हयांकडून माहिती मागविण्यात आली आहे. बीड जिल्ह्याची माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### वानवडी (जि.पुणे) येथील परिसरातील रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(२) १२९५६ (३०-०३-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानवडी (जि.पुणे) परिसरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांचे बांधकाम चेंबरला समांतर करण्यात आले नसल्यामुळे रस्त्यावर अपघात होवून जीवितहानी व वित्तहानी होण्याच्या घटना होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रस्त्यांची दुरुस्ती करुन समांतर रस्ते बांधण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रस्त्याची दुरुस्ती करुन समांतर रस्ते बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२५-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

वानवडी परिसरातील काही भागात पाणीपुरवठा विभागाकडून जलवाहिनी, मलवाहिनी व अन्य कामे करण्यात येत आहेत. सदर कामे पूर्ण झाल्यानंतर महानगरपालिका पथ विभाग मुख्य खाते व क्षेत्रिय कार्यालयामार्फत रस्त्यांचे डांबरीकरण करुन सर्व चेंबर्स रस्त्याच्या समपातळीत करण्यात येतात.
(३) हे खरे नाही.
(४) वानवडी प्रभागात सन २०२१-२२ अंतर्गत MNGL, ड्रेनेज विभाग, पाणीपुरवठा विभागाकडील अत्यावश्यक कामे करण्याकरीता खोदाई केलेल्या रस्त्याच्या कडेने डांबरीकरण करण्यात आलेले आहे. सदर डांबरीकरण दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर चेंबर समपातळीत करण्याचे काम केलेले आहे व उर्वरीत कामे चालू आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महावितरणच्या वीज दरवाढीमुळे राज्यातील वीज ग्राहकांवर आर्थिक भार येत असल्याबाबत

**(३) १४९९१ (०८-०७-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील महावितरण कंपनी प्रतियुनिट ५ पैसे ते २५ पैशांपर्यंत इंधन समायोजना शुल्क वसूल करीत असल्यामुळे वीज ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज नियामक आयोगाने दिनांक ३० मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास विजेचे दर निश्चित केले असून, सदर कालावधी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पूर्ण होणार असून महावितरण वीज दरवाढीसाठी याचिका दाखल करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वीज नियामक आयोग दर पाच वर्षासाठी विजेचे दर निश्चित करुन अडीच वर्षापर्यंत संशोधनाची मागणी ग्राहय धरून महावितरण विभाग मनमानी करून अतिरिक्त भुदंर्ड लावून वीज ग्राहकाकडून असंविधानिक सक्तीची वसूली करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने वीज दरवाढीचा प्रस्ताव नाकारून व सामायोजीत केलेली इंधन समायोजन शुल्काची रक्कम विज ग्राहकांच्या बिलातून वगळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०१-२०२३) :** (१) हे खरे आहे.

सदर आकार मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या मान्यतेच्या अनुषंगाने महावितरणव्दारा आकारण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीज दर) विनियम, २०१९ मधील तरतुदींनुसार, मध्यावधी आढावा वीज दर याचिका दिनांक ३०/११/२०२२ पर्यंत दाखल करणे आवश्यक आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत

**(४) १५१०८ (१०-१२-२०२२) श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांमधील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना मूलभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याने विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीनंतर विभागाकडून अचानक दिलेल्या भेटीदरम्यान वसतिगृहातील कामकाजात अनियमितता असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आश्रमशाळा व वसतिगृहांवर मूलभूत सोयी सुविधांसाठी शासनामार्फत दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असतानाही बहुतांश वसतिगृहात गृहपाल नसणे, नोंदवहीत नोंद असून विद्यार्थी अनुपस्थित असणे, अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत नसणे, संगणक कक्ष, भोजन कक्ष, ग्रंथालय व पिण्याच्या पाण्याची सोय नसणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आश्रमशाळा व वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना मूलभूत सोयी-सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१४-१२-२०२२) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

अपर मुख्य सचिव (इ.मा.ब.क.वि.) यांनी माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०२२ या कालावधीत विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांना दिलेल्या भेटीदरम्यान प्रामुख्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेची पाहणी करण्यात आली. त्यावेळी काही आश्रमशाळांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव दिसून आला.

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी त्यांचे राहणीमान, आरोग्य उत्तम स्थितीत राहणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आश्रमशाळांमधील एकूणच सोयीसुविधांमध्ये सुधारणा करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक ०३/०८/२०२२ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## लासूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथे ग्रामीण रुग्णालय उभारण्याबाबत

**(५) १५३१५ (२९-११-२०२२) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १०५७० ला दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लासूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) स्टेशन येथील ५० वर्षे जुने, मोडकळीस आलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करण्यात येईल असे आश्वासन शासनाने दिनांक २३ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,पंचक्रोशीतील ८० ते ९० गावांचा संपर्क असलेल्या सदर आरोग्य केंद्राची स्थापना सन १९६९ मध्ये झाली असून ३०० ते ३५० रुग्ण ओपीडी करीता येत असून अपुरा कर्मचारी वर्ग असतानाही अद्याप कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) लासूर (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) स्टेशन येथे प्राथमिक आरोग्य केंद्राचे रुपांतर ग्रामीण रुग्णालयात करण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त आरोग्य सेवा यांना प्राप्त झाला असून प्रस्तावामध्ये आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्याबाबत उपसंचालक, आरोग्य सेवा, औरंगाबाद मंडळ, औरगांबाद यांना दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने औरंगाबाद जिल्ह्यातील लासूर या परिसरातील ग्रामीण भागातील रुग्णांना आवश्यक त्या आरोग्य विषयक सोई-सुविधा मिळण्यासाठी ग्रामीण आरोग्य केंद्र स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१५-१२-२०२२) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्राथमिक आरोग्य केद्र लातूर स्टेशन (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) च्या ३० खाटाचे ग्रामिण रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याबाबतचा प्रस्ताव निकषात बसत नसल्याने सदर प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली नाही

(४) लासूर येथे प्राथमिक आरोग्य केद्र कार्यरत असून गंगापूर, जि.औरंगाबाद येथे ५० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय कार्यरत आहे तसेच लासुर स्टेशन येथे ग्रामिण रुग्णालयास श्रेणीवर्धन करण्याचा प्रस्ताव निकषात बसत नाही त्यामुळे सदर प्रस्ताव मान्य करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जठारवाडी (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे कार्तिकी वारीसाठी पंढरपूरला पायी निघालेल्या दिंडीतील भाविकांचा अपघात झाल्याबाबत

**(६) १५५७८ (०५-१२-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील जठारवाडी (ता.करवीर) येथे कार्तिकी वारीसाठी पंढरपूरला विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या दिंडीत भरधाव कार घुसल्याने सात भाविक जागीच ठार झाले, तर पाच जण गंभीर जखमी झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघाताची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अपघातात मृत पावलेल्याच्या व जखमींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

जठारवाडी, ता.करवीर, जि.कोल्हापूर येथील वारकरी पंढरपूरकडे पायी जात असताना दिनांक ३१/१०/२०२२ रोजी सांगोला, जि.सोलापूर हद्दीत भरधाव कार वारीमध्ये घुसल्याने ७ वारकरी जागीच मृत्य पावले असून एका वारकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. तसेच ६ वारकरी जखमी झालेले आहेत.
(२) उपरोक्त प्रकरणी सांगोला पोलीस ठाणे येथे वाहन चालकांविरुध्द गु.र.नं.१२२३/२०२२ भा.द.वि. कलम ३०४, ३३७, ३३८, २७९, १७७ सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४, ३(१)/१८१, ५/१८१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर अपघातातील एका आरोपीस अटक करण्यात आली असून दुसऱ्या आरोपीस सी.आर.पी.सी. ४१ प्रमाणे नोटीस देण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

सदर अपघातातील ७ मृत व्यक्तींच्या वारसास मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रुपये ५ लक्ष इतकी आर्थिक मदत देण्यात आली असून उपचारादरम्यान मृत पावलेल्या वारकऱ्याच्या वारसास आर्थिक मदत देण्याबाबत जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास दिनांक ०८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ट्रामा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्याबाबत

**(७) १५६७० (१०-१२-२०२२) : दिनांक २१ डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १३९२१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ट्रामा केअर युनिटची केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे व्यवहार्यता तपासून धोरण निश्चित करण्यासाठी शासनाने समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व त्या अहवालात नमूद केलेल्या शिफारशींचे थोडक्यात स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, ट्रामा केअर सेंटर्स पैकी ६३ सेंटरर्स कार्यरत असून ४५ सेंटर्स ही नऊ वर्ष झाली तरी कागदोपत्री मंजूर असून १५ सेंटर्सचे अर्धवट बांधकाम झाले असून ३० सेंटर्सचे आराखडे तयार नाहीत तर काही सेंटरसाठी जागा उपलब्ध नसल्याची बाब दिनांक १८ एप्रिल, २०२२ रोजी निदर्शनास आली आहे

तसेच सन २०१३ च्या बृहत आराखड्यानुसार ४२ नविन ट्रामा केअर सेंटर्सना मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अस्तित्वात असलेल्या ट्रामा केअर यूनिट संबंधित सुधारित आकृतिबंध शासनास सादर करण्यात आला असून, त्यात आढळलेल्या त्रुटीसंदर्भात आयुक्तालयाकडून माहिती प्राप्त झाली आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात ट्रामा केअर युनिटचे केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक कार्यवाही केली आहे काय, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. तानाजी सावंत (१६-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील ट्रॉमा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या आधारे ट्रॉमा केअर युनिटसाठी धोरण तयार करुन शासनास सादर करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१८/प्र.क्र. १९०/आरोग्य-३ सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक २२/११/२०१८ अन्वये तांत्रिक समिती गठीत करण्यात आली होती.
(२) होय, हे खरे आहे.

सदर समितीचा अहवाल आयुक्तालयाकडून दिनांक १३/११/२०१९ अन्वये शासनास सादर करण्यात आला होता. यापुढे नवीन ट्रॉमा केअर युनिटला मान्यता देतांना ते जिल्हा रुग्णालय/सामान्य रुग्णालय/उपजिल्हा रुग्णालय (१०० बेड) याठिकाणी मंजूर करण्यात यावे तसेच, त्यासाठी दोन लेवल-३ ट्रॉमा केअर युनिटमध्ये १०० ते २०० किलो मीटर अंतर असावे असे नमुद केले आहे.

ट्रॉमा केअर युनिटची व्यवहार्यता तपासून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ट्रॉमा केअर युनिटबाबत शासनास शिफारस करण्यासाठी गठीत तांत्रिक समितीचा अहवाल/ शिफारशी शासन निर्णय दिनांक १८/०९/२०२० अन्वये स्विकारण्यात आल्या आहेत.
(३) हे अंशत: खरे आहे.

सन २०१३ च्या बृहत आराखड्यापूर्वी ६९ ट्रामा केअर यूनिट मंजूर असून, सन २०१३ च्या बृहत आराखड्यामध्ये ३९ ट्रामा केअर यूनिट मंजूर करण्यात आले आहे.

राज्यात १०८ ट्रॉमा केअर सेंटर्सला मंजूरी देण्यात आलेली असून ६३ ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित झालेली आहे व ४५ ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर ४५ ट्रॉमा केअर युनिट पैकी १२ ट्रामा केअर यूनिटचे बांधकाम पूर्ण झाले असून १० ठिकाणी बांधकाम सुरू आहे. ३ ठिकाणी जागा उपलब्ध नाही. ९ ठिकाणी अंदाज आराखडे अप्राप्त आहे. ६ ठिकाणचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आला आहे. ४ ठिकाणी निविदास्तरावर आहे. आणि १ ठिकाणी शासन स्तरवरून निधी अप्राप्त आहे.
(४) व (५) आयुक्तालयाने सदर शिफारशी विचारात घेवून अस्तित्वात असलेल्या ट्रामा केअर यूनिट संबंधित सुधारित आकृतिबंध दिनांक २९/१२/२०२१ रोजी शासनास सादर केला आहे. परंतु, सदर आकृतीबंधाच्या प्रस्तावातील त्रुटिसंदर्भात आयुक्तालयाकडून माहिती मागविण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

## नवी मुंबई महानगरपालिकेमधील परिमंडळ-२ प्रभागामधील रस्त्यावरील दिवाबत्तीचे परिचलन करणे व देखभाल दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) १५७२६ (२५-११-२०२२) श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेतील परिमंडळ-२ (दिघा, ऐरोली, घणसोली व कोपरखैरणे) या प्रभागात विद्युत विभागातील रस्त्यावरील दिवाबत्तीचे परिचलन करणे व देखभाल दुरुस्तीची कामे संबंधित अधिकारी कंत्राटदाराकडून नियमबाह्यरित्या व आर्थिक संगनमताने करुन घेत असल्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेचे करोडो रुपयांचे नुकसान झाले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील संपूर्ण विद्युत विभागामध्ये सुरु असलेल्या कामांची पारदर्शकता आणण्यासाठी प्रगत तंत्रज्ञान विकास केंद्र, पुणे (CDAT) या कंपनीमार्फत "दक्ष" नावाचे ॲप्लीकेशनला कामकाजामध्ये आणले असून नवी मुंबई महानगरपालिकेमधील विद्युत विभागामार्फत लावण्यात आलेले सर्व जी.पी.आर.एस. पिलर्सच्या कामांचे बिलींग व कंत्राटदाराचे देयक तसेच (केपीआय मॉनिटरींग पेनल्टी) हे "दक्ष" ॲपच्या लाईव्ह रेकॉर्ड (डाटा) ने ठरवले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेमधील विद्युत विभागाच्या माहितीनुसार परिमंडळ-२ विद्युत विभागामार्फत लावण्यात आलेल्या जी.पी.आर.एस. पिलर्सचा लाईव्ह डाटा दक्ष ॲपवर दिसत नाही, परंतु बिलिंग करताना हा संपूर्ण डाटा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या आर्थिक संगनमताने Excel (एक्सल) ॲप मध्ये अंदाजे बनवून CDAT या कंपनीला पाठवला जातो व (CDAT) कंपनीमार्फत सदर डाटा दक्ष ॲपवर अपलोड केल्यानंतर उक्त डाटा ॲपवर दिसत असल्यामुळे सदरहू गैरप्रकार कंपनीच्या निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेमधील परिमंडळ-२ प्रभागामधील रस्त्यावरील दिवाबत्तीचे परिचलन करणे व देखभाल दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१४-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

नवी मुंबई परिमंडळ-२ अंतर्गत दिघा, ऐरोली, घणसोली व कोपरखैरणे असे एकूण ४ विभाग असून, या क्षेत्रातील विद्युत दिवाबत्तीचे परिचलन करणे व देखभाल दुरूस्ती करणेच्या कामासाठी, विभाग निहाय सन २०१९ मध्ये, ऑनलाईन निविदा काढून तांत्रिकदृष्ट्या पात्र ठेकेदारांपैकी न्यूनतम ठेकेदारास ५ वर्ष कालावधीकरीता कामे देण्यात आलेली आहेत.

सदर ठेकेदारांकडून दैनंदिन दिवाबत्तीची सुविधा विनाखंड पुरविण्यात येते. सदरचे काम नियमानुसार सुरू आहे.

(२) व (३) • नागरिकांना दिवाबत्तीची सुविधा दैनंदिन विनाखंडीत पुरविण्याच्या अनुषंगाने देखभाल दुरूस्तीसाठी ठेकेदाराकडून GPRS Monitoring System (पिलर्स) निविदेतील संख्येप्रमाणे बसविण्यात आलेले आहेत.

• ठेकेदाराकडून दिवाबत्ती सेवा नागरिकांना व्यवस्थित व विना खंडीत पुरविण्यासाठी CDAT या कंपनीकडून ‘दक्ष’ ॲप्लीकेशन तयार करून घेण्यात आलेले आहे.

• GPRS पिलर्सचा Electric Current Paramater Data हा ‘दक्ष’ ॲप्लीकेशन द्वारे घेण्यात येतो. सदर डाटा ‘दक्ष’ ॲप्लीकेशनमध्ये त्याचेवळी जात नसून, तो दुसऱ्या दिवशी किंवा त्यापुढील दिवशी दक्ष ॲप्लीकेशनवर घेतला जातो.

• सदर ‘दक्ष’ ॲप्लीकेशन मधील इलेक्ट्रीक Current Data व नवी मुंबई महानगरपालिकेकडून सेट करण्याबाबत आलेला बेंच मार्क यांतील फरकानुसार ठेकेदारावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येते.

• नवी मुंबई महानगरपालिकेकडून सेट करण्यात आलेल्या बेंच मार्कवर आधारीत दंडात्मक कारवाई करताना तांत्रिक अडचणींमुळे दाखविण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी शिथील करण्यात येते.

• तथापि, GPRS पिलर्सचा Live data महानगरपालिकेकडून Excel मध्ये अंदाजे बनवून CDAT कंपनीला पाठवून मग CDAT कंपनीमार्फत उक्त डाटा ‘दक्ष’ ॲपवर अपलोड केल्यानंतर उक्त डाटा ॲपवर दिसतो, याप्रकारची बाब कंपनीच्या निदर्शनास आल्याबाबत, कंपनीने कोणतीही तक्रार/निवेदन महानगरपालिकेकडे केलेले नाही. त्यामुळे यामध्ये कोणताही गैरप्रकार झाला नसल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

## राज्यातील साखर कारखान्यांची ऊसतोड मजूर व मुकादमांकडून फसवणूक होत असल्याबाबत

**(९) १५९०४ (२५-११-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गाळप हंगाम २००४ ते २०२० या १६ वर्षाच्या कालावधीत राज्यातील ८१ साखर कारखान्यांची ऊसतोड मुकादमाकडून रुपये ३९ कोटी ४६ लाख ८४ हजार ३२२ ची फसवणूक झाल्याचे साखर आयुक्तांनी दिलेल्या माहितीतून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक वर्षीच्या गाळप हंगामात ऊसतोड मुकादमांकडून फसवणुकींचे प्रकार घडत असून, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रशांत भोसले रा.बिंबळे, ता.माढा या वाहन मालकाची मध्य प्रदेशातील ऊसतोड मजूर व मुकादम यांनी हत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ऊसतोड मजूर व मुकादमांकडून होत असलेल्या फसवणुकीच्या प्रकारांवर आळा घालण्याबाबत तसेच ऊसतोड मजूर व मुकादम यांची गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळाकडे नोंदणी करुन महामंडळामार्फत कारखान्यांना ऊसतोड मजूर पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (१५-१२-२०२२) :** (१) होय.
(२) श्री.प्रशांत भोसले रा.बेंबळे, ता.माढा, जि.सोलापूर हे ऊस उत्पादक शेतकरी असून, ते ऊसतोड मजूर आणण्याकरीता सेंधवा, जि.बडवाणी, मध्य प्रदेश येथे गेले असता त्यांची हत्या झाली आहे. याबाबत सेंधवा, जि.बडवाणी, मध्य प्रदेश येथील पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ०६/११/२०२२ रोजी FIR दाखल करण्यात आला आहे.
(३) शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ अन्वये ऊसतोड कामगार ज्या ठिकाणी वास्तव्याला आहेत व जे मागील तीन वर्ष ऊसतोड कामगार म्हणून काम करत असतील त्यांची ग्रामसेवकाने विहित नमुन्यात नोंदणी करुन ओळखपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २८/१०/२०२१ अन्वये राज्यातील ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षण/ नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लीकेशन महाआयटी मार्फत करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ऑनलाईन नोंदणी करीता वेब पोर्टल तयार करण्याची कार्यवाही लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी जिल्ह्यातील भूमीअभिलेख कार्यालयातील प्रलंबित प्रकरणांबाबत

**(१०) १५९७९ (०३-१२-२०२२) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भूमि अभिलेख विभागात मनुष्यबळाअभावी जमिनींच्या तब्बल १ लाख ३ हजार मोजण्या प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी जिल्ह्यातील भूमी अभिलेख कार्यालयात शेत जमिनीच्या मोजणीसाठी हजारो अर्ज शुल्क भरूनही वर्षभरापासून प्रलंबित असल्याने शेतकरी व नागरीकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, माहे मे, २०२२ अखेर एकूण १५१२ मोजणी प्रकरणे उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालय, जि.परभणी येथे प्रलंबित असून त्यापैकी १७२ मोजणी प्रकरणे ही अनेक वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, १ वर्षावरील मोजणी प्रकरणे नियोजन करून २ महिन्यात निकाली काढण्याच्या सूचना जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, परभणी यांना मा.महसूल मंत्री यांनी दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित व निकाली काढण्यात आलेल्या मोजणी प्रकरणांची तालुकानिहाय माहिती तसेच विहित मुदतीत प्रलंबित प्रकरणे निकाली न काढणाऱ्या संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१९-१२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यात सर्व प्रकारची ऑक्टोबर, २०२२ अखेर एकूण ९६,३३९ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत.

(२) हे खरे आहे.

जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, परभणी कार्यालयाचे अधिनस्त मार्च, २०२२ अखेर सर्व प्रकारची एकूण १२५० मोजणी प्रकरणे शिल्लक होती. एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ अखेर १९३६ मोजणी प्रकरणांची आवक झालेली असून त्यापैकी १७२३ निकाली झालेली आहेत. नोव्हेंबर, २०२२ अखेर सर्व प्रकारची एकूण १,४६३ मोजणी प्रकरणे मोजणी करणेवर प्रलंबित आहेत.

(३) हे अंशत: खरे आहे.

मे, २०२२ अखेर १५१२ एकूण प्रकरणे प्रलंबित होती. त्यापैकी १७२ मोजणी प्रकरणे एक वर्षावरील होती. सदर १७२ प्रकरणांपैकी ११६ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून उर्वरित प्रकरणी कार्यवाही सुरू आहे.

(४) अपर मुख्य सचिव (महसूल) यांनी दिनांक ०८/०७/२०२२ रोजी बैठकीमध्ये मार्च, २०२२ अखेरची सर्व प्रलंबित मोजणी प्रकरणे डिसेंबर, २०२२ अखेर निकाली करणेबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) व (६) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख यांचे अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांना मुदतबाह्य मोजणी प्रकरणे सत्वर निकाली काढणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच दोषी आढळून आलेल्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

---

## केंद्र शासनाच्या निती आयोगाच्या धर्तीवर राज्यात स्वतंत्र संस्था स्थापन करण्याबाबत

**(११) १६०५० (१०-१२-२०२२) अॅड.अनिल परब, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध क्षेत्रांतील विकासासाठी केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या धर्तीवर राज्यस्तरीय संस्था स्थापन करण्यात येणार असून या संस्थेचे नांव "इंन्स्टिटयूट ऑफ ट्रान्सफॉरमेशन " असे असणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्वतंत्र संस्थेची रचना व सदर संस्थेकडे कोणकोणत्या बाबी सोपविण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सेवा व योजनाचा लाभ अधिक पारदर्शक आणि जलद गतीने उपलब्ध होण्यासाठी सदरील संस्था स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२०-१२-२०२२) :** (१) होय. नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्र) या संस्थेची स्थापना दिनांक ११/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारा विचार गट (Think Tank) म्हणून "मित्र" ही संस्था कार्यरत राहणार आहे.

---

## मुंबईतील मेट्रो-३ प्रकल्पातील गिरगाव-काळबादेवी परिसरातील तांत्रिक मुद्यावरुन अपात्र ठरविलेल्या रहिवाशांच्या फाईलबाबत निर्णय घेण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१२) १६०८३ (०५-१२-२०२२) ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मेट्रो-३ प्रकल्पातील गिरगाव-काळबादेवी परिसरातील तांत्रिक मुद्यावरुन अपात्र ठरण्यात आलेल्या शंभरपेक्षा जास्त रहिवाशांच्या फाइलवर मेट्रोने पात्रतेसाठी नेमलेल्या म्हाडा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांकडून निर्णय घेण्यास आणि त्याबाबत करावयाच्या कार्यवाहीकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, फाइलवर कार्यवाही करावयाची असेल तर एका फाईलमागे तीन लाखाची लाच मागितली जात असल्याच्या आरोप रहिवाश्यांनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यसान केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाच मागणाऱ्या म्हाडा अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत तसेच मेट्रो-३ प्रकल्पातील तांत्रिक मुद्यावरुन अपात्र ठरलेल्या रहिवाश्यांच्या पुनर्विकासाच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-१२-२०२२) :** (१) मुंबई मेट्रो लाईन-३ प्रकल्पातील बाधित उपकरप्राप्त इमारतींमधील ६१३ भाडेकरु/ रहिवाशांची पात्रता यादी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत जाहीर करण्यात आली होती. यापैकी १६४ भाडेकरु/ रहिवाशांनी याबाबत मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांचेकडे हरकती अर्ज दाखल केलेले असून यापैकी केवळ ३ अर्ज कागदपत्रांच्या अभावी प्रलंबित आहेत. मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांच्या निर्णयाविरुध्द ४२ भाडेकरु/ रहिवाशांनी उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांचेकडे प्रथम अपिल दाखल केलेले असून यापैकी ३८ प्रकरणांमध्ये आदेश निर्गमित झालेले आहेत.
(२) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(३) सक्षम प्राधिकरणाकडून अंतिम अपिलाद्वारे प्रकल्पबाधित अपात्र ठरला तरी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्या कायमस्वरुपी पुनर्वसन धोरणानुसार संबंधित प्रकल्पबाधीतास मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाचे पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांचेकडे उपलब्ध असलेल्या निवासी सदनिका/ अनिवासी गाळा वितरित करुन पुनर्वसन करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात आदिवासी भागातील विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा आदिवासी सुधार योजनेला गेल्या २ वर्षापासून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नसल्याबाबत

**(१३) १६३८२ (०६-१२-२०२२) श्री.आमश्या पाडवी, श्री.अंबादास दानवे, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी भागातील विकासासाठी असलेल्या ठक्करबाप्पा आदिवासी सुधार योजनेला गेल्या २ वर्षापासून निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निधी उपलब्ध करुन देण्यात आला नसल्यामुळे राज्यातील ३० आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत गावातून विकासकामे ठप्प झाली आहेत, हे खरे आहे काय
(३) आदिवासी वस्त्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेच्या मार्फत करावयाची कामे, अंमलबजावणी व इतर निकष यात सुधारणा करण्याबाबत मंत्री मंडळाची उप समिती स्थापन करण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री यांनी माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा समितीबाबत मंत्री मंडळाच्या उप समितीची स्थापना करण्यात आली आहे काय, समितीच्या बैठका घेण्यात आल्या आहेत काय, समितीमार्फत शासनाला आदिवासी भागाच्या विकासासाठी व तेथील नागरीकांना मूलभूत सुविधा मिळाव्या यासाठी कोणत्या सुधारणा सुचविण्यात आल्या, सुचविलेल्या सुधारणा मार्फत आदिवासी भागाच्या विकासासाठी किती निधीची तरतुद करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (१५-१२-२०२२) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

सन २०२१-२२ करीता जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजनेसंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या दिनांक २०/०१/२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये "पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींना ५ टक्के अबंध निधी" ही राज्यस्तरावरील योजना जिल्हा योजनेंतर्गत वर्ग करण्यात आली असल्यामुळे जिल्हा स्तरावरील समप्रमाणातील दायित्व कमी करण्यासाठी "ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा" ही योजना सन २०२१-२२ पासून राज्यस्तरावर वर्ग करण्यात आली आहे. सदर अनुषंगाने या योजनेंतर्गत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी यंत्रणा/कार्यपध्दती व इतर निकष सुधारित करण्याचा प्रस्ताव मा.मंत्रिमंडळ बैठकित सादर करण्यात आला असता सदर प्रस्तावावर मंत्रिमंडळाने चर्चा करुन "मंत्री मंडळास शिफारस करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे."
(४) प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दिनांक २८/११/२०२२ अन्वये मां. मंत्रिमंडळ उप समिती गठित करण्यात आलेली असून अद्याप सदर समितीची बैठक होवू शकली नाही.

ठक्कर बाप्पा वस्तीसुधार योजनेंतर्गत सन २०२२-२३ करीता राज्यस्तरावर रुपये २५०.०० कोटी इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपळगांव घोडे (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील मुक्ताई शाळेच्या विद्यार्थ्यांच्या स्कूलबसला गिरवली येथे झालेल्या अपघाताची चौकशी करून मृत व जखमींच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(१४) १६३८७ (०६-१२-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळगांव घोडे (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील मुक्ताई शाळेचे विद्यार्थी व विद्यार्थीनींना घेऊन जाणाऱ्या स्कूल बस गिरवली येथील आयुका केंद्राच्या घाट वळणावरुन दरीत पडून भीषण अपघात झाल्याची घटना दिनांक २७/०९/२०२२ रोजी वा त्यासुमारास घडली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघातात किती जण मृत व जखमी झालेले आहेत, अपघाताची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे, चौकशीच्या अनुषंगाने अपघातात झालेल्या मृत व जखमींच्या नातेवाईकांना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर अपघातामध्ये ०५ पुरूष व २४ विद्यार्थी गंभीर जखमी झाले असून २० विद्यार्थ्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. उपरोक्त प्रकरणी घोडेगाव पोलीस ठाणे येथे स्कुल बस चालक याच्या विरुध्द गु.र.नं.२२५/२०२२ भा.द.वि. कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ सह मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस सी.आर.पी.सी. ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस देण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरू आहे.
सदर अपघातात जखमीं विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबतच्या प्राप्त प्रस्तावावर जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडून योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टाकळी अंतूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील प्राथमिक शाळेच्या धोकादायक इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(१५) १६३९५ (२५-११-२०२२) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी अंतूर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) येथील जि.प.प्राथमिक शाळेच्या इमारतीची दयनीय अवस्था झाली असून येथील वर्गखोल्या धोकादायक झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या बाहेर ज्ञानार्जन करण्याची वेळ आली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, टाकळी अंतूर येथे जिल्हा परिषदेची पहिली ते चौथी पर्यंतची शाळा असून येथे अनेक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा परिषद शिक्षण विभागाने गत अनेक वर्षापासून या शाळेच्या इमारतीच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष केल्याने या वर्ग खोल्या मोडकळीस आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, टाकळी अंतूर येथील शाळेसह मराठवाड्यातील निजामकालीन सर्व शाळांची दुरुस्ती देखभाल किंवा नव्याने शाळा बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (१५-१२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

सदर शाळेतील ५ पैकी ३ वर्गखोल्यांस किरकोळ दुरुस्ती आवश्यक आहे.

(२) सदर शाळेत ९५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) जिल्हा परिषदांकडून वर्ग खोल्यांची निकड व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हा वार्षिक योजना, जिल्हा परिषद सेस फंड, आमदार-खासदार निधी, चौदावा/ पंधरावा वित्त आयोग व सी.एस.आर इत्यादी माध्यमांतून दुरुस्ती/ बांधकामे करण्याबाबत तजवीज ठेवण्यात येते.

तसेच राजमाता जिजाऊ शैक्षणीक गुणवत्ता अभियानांतर्गत मराठवाड्यात रुपये २०० कोटींच्या वर्गखोली बांधकामांना मान्यता देण्यात आली असून रुपये ९२ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सुधागड-पाली तालुक्यातील अंबा नदीवरील बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१६) १६४९४ (०७-१२-२०२२) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बलाप (ता.सुधागड, जि.रायगड) गावाजवळील अंबा नदी जवळ के.टी. बंधारा बांधून नदीच्या पाण्याची साठवणूक करून पाली शहर व नगरपंचायत हद्दीतील गावांना पाणीपुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यःस्थितीत हा बंधारा नादुरूस्त झालेला असून अनेक ठिकाणी स्लॅब तुटलेला आहे, तसेच बंधाऱ्याला आधार देणारे दगडी खांब मोडकळीस आल्यामुळे बंधाऱ्याची दुरूस्ती वेळीच न केल्यास पाणीगळती होऊन तेथील ग्रामस्थांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बंधाऱ्याची दुरूस्ती करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१९-१२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. बंधाऱ्यावरील स्लॅब काही ठिकाणी तुटलेले आहे. पावसाळा संपल्यानंतर बंधाऱ्यात लोखंडी बर्गे घालण्यात आले असताना बंधाऱ्याच्या दगडी खांबातून काही प्रमाणात पाण्याची गळती होते. तथापि, कोणत्याही स्वरुपाची पाणी टंचाई निर्माण होत नाही.

(३) स्लॅब दुरुस्ती कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली असून दगडी खांब दुरुस्ती कामांस प्रापणसूचीमध्ये मंजूरी घेऊन काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दादरमधील छबिलदास शाळेमध्ये सिलेंडरचा स्फोट होवून दुर्घटना झाल्याबाबत

**(१७) १६५०७ (०६-१२-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादरमधील छबिलदास इंग्लिश शाळेच्या गच्चीवर झालेल्या गॅसच्या स्फोटात शाळेच्या उपहारगृहातील तीन कर्मचारी जखमी झाले असल्याची घटना दिनांक २ नोव्हेंबर, २०२२ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू शाळेला दिवाळीची सुट्टी असल्याने मोठी दुर्घटना टळली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईत सातत्याने होत असलेल्या सिलेंडर स्फोटाचा प्रश्न ऐरणीवर आला असून उक्त प्रकरणी बेकायदा सिलेंडरचा साठा करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१३-१२-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) प्रस्तुत प्रकरणी शिवाजीपार्क पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६१०/२२ भा.दं.वि. कलम ३०४(अ), ३३७, ३३८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पूर्णा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे युरिया खताचा अवैध साठा जप्त केल्याबाबत

**(१८) १६५३१ (०३-१२-२०२२) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूर्णा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील महालक्ष्मी वेअर हाऊसच्या गोदामावर नारपोली पोलीसांनी टाकलेल्या धाडीत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या निमकोटेड अनुदानित युरीया खताचा ९ टन खत साठा अवैधरित्या असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गोदामात ७० टनपेक्षा अधिक निमकोटेड अनुदानित युरीया खताचा साठा असताना ९ टन इतकाच खत साठा असल्याचे कागदोपत्री नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त साठा हा नाशिक येथील गौतम डायकेम व अन्य दोन पुरवठादारांचा असून हे पुरवठादार सदरहू खत साठा करुन पालघर, रायगड, ठाणे जिल्ह्यासह राज्यात व इतर राज्यातील खाजगी कंपन्यांना अवैधरित्या पुरवठा करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अवैधरित्या खत साठा करणाऱ्या पुरवठादारांकडे संबंधित विभागाचे अधिकारी व पोलीस अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने फसवणूक करुन खाजगी कंपनीना पुरवठा करणाऱ्या पुरवठादारांवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (१५-१२-२०२२) :** (१) पूर्णा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील महालक्ष्मी वेअर हाऊसच्या गोडाऊनमध्ये दिनांक १९/०९/२०२२ व दिनांक २०/०९/२०२२ रोजी टाकण्यात आलेल्या धाडीत २५.५५ मे.टन एवढा नीमकोटेड अनुदानित युरिया खताचा साठा अवैधरित्या साठविण्यात आल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे नाही. सदर ठिकाणी २५.५५ मे. टन एवढा नीमकोटेड अनुदानित युरिया खताचा साठा अवैधरित्या साठविला असल्याचे दिसून आले.
(३) व (४) हे खरे नाही.

सदर प्रकरणी कृषी विभागाकडून संबंधितांविरुध्द नारपोली पोलीस ठाणे, ता.भिवंडी येथे प्रथम खबरी अहवाल क्र. ५७७/२०२२ हा दिनांक १३/१०/२०२२ अन्वये दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये पोलीस तपास सुरु आहे.
(५) प्रस्तुत प्रकरणी कृषी विभागाचे अधिकारी व पोलीस अधिकारी यांनी पूर्णा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील महालक्ष्मी वेअर हाऊसच्या गोडावून मालकाचे स्टॉक कार्डची तपासणी केली. सदर तपासणीमध्ये फोर्स फार्मा, योग इंटरप्रायजेस, गौतम केम या कंपन्यांचा एकूण रुपये १६,९६,७००/- इतक्या किंमतीचा ८९.३० मे. टन खताचा साठा आढळून आला आहे. यामध्ये योग इंटरप्रायजेस कंपनीचा २५.५५ मे.टन युरिया नमुन्यामध्ये नीम ऑईल आढळून आले आहे. त्यानुषंगाने, योग इंटरप्रायजेस कंपनीविरुध्द नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी नारपोली पोलीस ठाणे यांचेमार्फत गुन्हयाचा तपास सुरु आहे. त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकारी/ कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## देशातील पहिली सर्पविष पेढी (व्हेनम बँक) आणि परीक्षण केंद्र राज्यात उभे करण्याबाबत

**(१९) १६८०३ (०३-१२-२०२२) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भारतातील सन २०२३ पर्यंत सर्पदंश मृत्यू अर्ध्यावर आणण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचाच एक भाग म्हणून देशातील पहिली सर्पविष पेढी आणि परीक्षण केंद्र महाराष्ट्रात उभे राहणार असल्याबाबतची माहिती मा.वने मंत्री यांनी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भारतातील सर्वाधिक सर्पदंश आणि त्यामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या महाराष्ट्रात जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्पदंश मृत्यू अर्ध्यावर आणण्याच्यादृष्टीने वैज्ञानिक पूर्वतयारीचा भाग म्हणून विविध ५२ विषारी सर्पांच्या विषाचा अभ्यास करण्यासाठी पायाभूत संरचना उभी करावी लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, देशातील पहिली सर्पविष पेढी (व्हेनम बँक) आणि परीक्षण केंद्र राज्यात उभे करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२७-१२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील सर्पदशांच्या घटना व त्यामुळे होणाऱ्या मृत्यूच्या घटनांचे विश्लेषण करुन अभ्यास करणे, राज्यामध्ये Anti-Snake Venom Serum (ASVS) च्या आवश्यकतेबाबत अभ्यास करणे व त्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याकरीता

सुचना करणे आणि राज्यामध्ये सर्पविष तपासणी केंद्र तसेच सर्पविष Repository / Bank स्थापित करण्याची पडताळणी करणेकरीता दिनांक १५/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५० अन्वये मालमत्ता हस्तांतरण करताना होणाऱ्या गैरव्यवहाराबाबत

**(२०) १६८०६ (०३-१२-२०२२) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम १५० व इतर कलमान्वये जमिनीचे हस्तांतरण करताना हितसंबंध असलेल्या व्यक्तीस गाव नमुना ९ ची नोटीस तलाठी यांचेमार्फत दिल्यानंतर पंधरा दिवसांत मालमत्तेशी हितसंबंध असणारी व्यक्ती हस्तांतरणासंबंधी आक्षेप नोंदवू शकते, ही बाब खरी आहे काय,
(२) असल्यास, अनेक वेळा हस्तांतरित होणाऱ्या मालमत्तेशी कोणताही हितसंबंध नसणाऱ्या व्यक्तींकडून आर्थिक फायद्यासाठी खोट्या तक्रारी तलाठी/ मंडळ अधिकारी/ तहसिल कार्यालय येथे दाखल करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३१ चा गैरवापर रोखण्यासाठी शासनाने दिनांक २४ सप्टेंबर, १९९७ रोजी परिपत्रक निर्गमित केले आहे त्याप्रमाणे कलम १५० चा गैरवापर रोखण्यासंदर्भात धोरण ठरविणे, आक्षेप घेतलेल्या तक्रारींचे निवारण करणे, त्यासंदर्भातील कालावधी निश्चित करणे इत्यादी गोष्टींमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कलम १५० चा गैरवापर रोखण्यासंदर्भात कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०१-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ च्या कलम १५० व इतर कलमान्वये जमिनीचे हस्तांतरण करतांना हितसंबंध असलेल्या व्यक्तीस गांव नमुना ९ ची नोटीस तलाठी यांच्या मार्फत दिल्यानंतर पंधरा दिवसांत मालमत्तेशी हितसंबंध असणारी व्यक्ती हस्तांतरणासंबंधी आक्षेप नोंदवू शकते. हस्तांतरीत होणाऱ्या मालमत्तेशी कोणताही हितसंबंध असणाऱ्या व नसणाऱ्या व्यक्तीकडून आर्थिक फायदयासाठी खोटया तक्रारी तलाठी/ मंडळ अधिकारी/ तहसिल कार्यालय येथे प्राप्त झाल्यास महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या (तयार करणे व सुस्थितीत ठेवणे) नियम, १९७१ मधील तरतुदीनुसार संबंधित व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेवून चौकशी केल्यानंतर निर्णय घेण्यात येतो.
(३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ३१ चा गैरवापर रोखण्यासाठी शासन परिपत्रक क्रमांक एस-१४९७/प्र.क्र.५१३/ल-६, दिनांक २४/११/१९९७ अन्वये, ज्या क्षेत्राचे नगर भूमापन झालेले आहे अशा जमिनीवर पीक पाहणीची नोंद न घेण्यासंदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे, सन २०१४ चा शासन अधिनियम क्र.३० अन्वये, महाराष्ट्र जमीन महसूल

अधिनियम, १९६६ च्या कलम १५० मधील पोटकलम २ मध्ये परंतुक समाविष्ट करुन भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ अन्वये दस्तऐवजांची नोंदणी करणाऱ्या अधिकाऱ्यासमोर ज्या व्यक्तींनी स्वत: दस्तऐवज निष्पादित केले असतील अशा व्यक्तींना, तहसिलदार कार्यालयातील तलाठ्याद्वारे कोणतीही सूचना पाठविणे आवश्यक असणार नाही अशी सुधारणा करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.